नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना स्विकारण्याचा विकल्प तसेच पूर्वीच्या सेवा कालावधीचे प्रमाणशिर निवृत्तीवेतन दायित्व स्विकारण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक : अंनियो १००८/९३/सेवा ४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १ डिसेंबर २००८

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अंनियो १००६/८७/सेवा ४, दिनांक १२ जानेवारी २००७
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सेनिवे १००८/१६/सेवा ४, दिनांक २६ फेब्रुवारी २००८

**प्रस्तावना**

संदर्भाधिन क्र.१ येथील दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. तथापी दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नवीन पदावर नियुक्ती स्विकारलेल्या तसेच संदर्भाधिन क्र.२ मध्ये नमूद केलेल्या दि.१२ जानेवारी २००७ च्या परिपत्रकामध्ये विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता करणा-या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु आहे.

वर नमूद केल्यानुसार दि.१२ जानेवारी, २००७ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरत असलेल्यांपैकी काही कर्मचारी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र सद्य:स्थितीत अशा कर्मचा-यांकरिता कोणती योजना स्विकारावी याबाबतचा विकल्प देण्याची तरतुद उपलब्ध नाही. अशा कर्मचाऱ्यांना नवीन योजनेमध्ये सहभागी होण्याचा विकल्प देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे दि.१नोव्हेंबर २००५ पूर्वी निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या परंतू दि.१२ जानेवारी.२००७ च्या परिपत्रकातील सर्व अटींची (अट क्र. १ ते४) पूर्तता न करणा-या कर्मचा-यांच्या दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या सेवा कालावधीचे लाभ देण्याबाबत कोणतीही तरतुद नाही. ही बाब विचारात घेऊन दि.१२ जानेवारी.२००७ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीपैकी अट क्र. २ ची पूर्तता न करणा-या परंतु अट क्र.१,३ व ४ ची पूर्तता करणा-या कर्मचा-यांनी पूर्वी केलेल्या निवृत्तीवेतनार्ह सेवेच्या अनुषंगाने निवृत्तीवेतन विषयक लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**निर्णय**

दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नवीन पदावर नियुक्ती स्विकारलेल्या तसेच संदर्भाधिन क्र.२ मध्ये नमूद केलेल्या दि. १२ जानेवारी २००७ च्या परिपत्रकामध्ये विहित केलेल्या खालील अटींची पूर्तता करणा-या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु आहे:

i) शासकीय कर्मचाऱ्याची अगोदरची नियुक्ती नियमित स्वरुपाची असावी, म्हणजेच त्या शासकीय कर्मचाऱ्याची संबंधित पदासाठी विहीत करण्यात आलेल्या नियुक्ती नियमांच्या तरतूदींची (उदा. वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत /निवड मंडळामार्फत नियुक्ती इत्यादीबाबींची) पूर्तता करुन नियुक्ती झालेली असावी.

ii) शासकीय कर्मचाऱ्याने अगोदरच्या पदाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असावा.

iii) शासकीय कर्मचाऱ्याने नवीन पदासाठी केलेला अर्ज संबंधित कार्यालयाव्दारे/संबंधित प्रशासकीय प्राधिकाऱ्याची योग्यरित्या पूर्वपरवानगी घेऊन केलेला असावा.

iv) उपरोक्त दोन नियुक्त्यांमध्ये जर खंड असेल तर त्या खंडाचा कालावधी बदलीच्या नियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीहून अधिक नसावा.

२. या संदर्भात शासन आता असे आदेश देत आहे की, दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर नियुक्त झालेल्या व दि.१२ जानेवारी २००७ च्या परिपत्रकातील अट क्र.१, ३ व ४ ची पूर्तता करणा-या परंतु अट क्र २ ची पूर्तता करीत नसल्यामुळे जुनी निवृत्तीवेतन योजना लागु ठरत नाही अशा कर्मचा-यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये समावेशन झालेल्या दिनांकापूर्वीच्या सेवा कालावधीकरिताची ठोक रक्कम त्याच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात खालील सुत्रानुसार परिगणित करुन जमा करण्यात यावी:-

**निवृत्तीवेतनाचे भांडवली मूल्य (capitalised value):** निवृत्तीवेतन (शेवटच्या १० महिन्यात अर्जित केलेले सरासरी वेतन x अर्हताकारी सेवा वर्ष/६६ (सहामाही कालावधी)) x १२ x अंशराशीकरण तक्त्यानुसार वयाचे मुल्य.

**उपदान :** शेवटचे वेतन x अर्हताकारी सहामाही खंड / ४

**देय रक्कम = निवृत्तीवेतनाचे भांडवली मूल्य (capitalised value) + उपदान**

३. सदर रक्कम संबंधित कर्मचारी ज्या दिनांकास नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होईल व त्याचे प्रथम अंशदान जमा करेल त्या दिनांकास त्याच्या नवीन योजनेच्या खात्यात जमा झाली असे समजण्यात येईल. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये शासनामार्फत कोणतेही अंशदान जमा करण्यात येणार नाही.

४. दि.१२ जानेवारी २००७ च्या परिपत्रकांतील अट क्र.१,३ व ४ ची पूर्तता न करणा-या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ३३ व नियम ४८ विचारात घेता त्यांच्या पूर्वीच्या सेवेचे निवृत्तीवेतन विषयक कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरणार नाहीत.

५ तसेच दि.१२ जानेवारी २००७ च्या परिपत्रकातील सर्व अटी पूर्ण करत असलेल्या व त्यामळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजनेसाठी पात्र ठरत असलेल्या कर्मचा-यांना या योजनेऐवजी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असल्यास त्यांना ही योजना स्विकारण्याचा विकल्प देता येईल. सदर विकल्प हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापासून एक वर्षात व शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षात देण्याची मुभा राहील. एकदा दिलेला विकल्प अंतिम असेल. विकल्पाचा नमूना सोबतच्या जोडपत्रात देण्यात आला आहे. अशा कर्मचा-यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये समावेशन झालेल्या दिनांकापूर्वीच्या सेवा कालावधीकरिताची ठोक रक्कम त्याच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात परि.२ मध्ये दिलेल्या सुत्रानुसार परिगणित करुन जमा करण्यात येईल व वरील परिच्छेद ३ मधील तरतूदीही लागू राहतील. विहीत कालावधीत विकल्प न दिलेल्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहील.

६ हा शासन निर्णय, जिल्हा परिषदा तसेच मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये व निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या, अशा दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, *योग्य त्या फेरफारांसह,* लागू ठरेल. तसेच दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय, दि.१३.१०.२००० व दि.२७.२.२००३ अन्वये ज्या शिक्षण सेवकांच्या, कृषि विभागाचा शासन निर्णय दि.१७.२.२००४ अन्वये ज्या कृषि सेवकांच्या तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दि. ६.६.२००१ अन्वये नियुक्त झालेल्या ज्या ग्रामसेवकांच्या सेवा शासन निर्णय दि.२०.४.२००६ नुसार निवृत्तिवेतनासाठी ग्राहय ठरविण्यात आलेल्या आहेत व संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या शासन निर्णयानुसार तदनंतर नियमित वेतनश्रेणीत आणण्यात आल्या आहेत अशा कर्मचा-यांनाही हे आदेश लागु ठरतील.

७. यावरील खर्च संबंधित कर्मचा-याचे वेतन व भत्ते ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००८१२०२१५२८१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि.बा.वाडेकर**
**शासनाचे उप सचिव**

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, (५०० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक
(प्रत्येकीनिवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान-भवन, मुंबई - ४०० ०३२.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.
*पत्राद्वारे.

# जोडपत्र

## नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना स्विकारण्याच्या विकल्पाचा नमुना

(शासन निर्णय क्र.अंनियो १००८/९३/सेवा-४ दि.१/१२/२००८चे जोडपत्र)

कर्मचा-याचे नाव :
पदनाम :
कार्यालयाचा पत्ता :

प्रति,

कार्यालय प्रमुख,
--------------
------------- यांस

विषय : नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना स्विकारण्याबाबत .

महोदय/महोदया

मी श्री/श्रीमती..................................दि..............पासून दि.............पर्यंत................विभागात /कार्यालयात.................या पदावर कार्यरत होतो/होते. मी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अंनियो १००६/८७/सेवा ४, दिनांक १२ जानेवारी २००७ नुसार अटी व शर्तींची पूर्तता करत असल्याने मला महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ लागू करण्यात आली आहे. तथापि मी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र:-अंनियो १००८/९३/सेवा-४, दि.१/१२/२००८ नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होण्याचा विकल्प स्वेच्छेने स्विकारत आहे.

२. माझ्या हा विकल्प देण्यापूर्वी सध्याच्या सेवेच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील माझे अंशदान नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यास माझी हरकत नाही. याशिवाय नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेपोटी काही रक्कम जमा करावयाची शिल्लक असल्यास ती माझ्या वेतनातून योग्य त्या हप्त्याव्दारे वसुल करुन नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यासही माझी हरकत राहणार नाही.

३. सदर विकल्प अंतिम असून तो भविष्यात मला बदलता येणार नाही असे या जोडपत्राद्वारे मी मान्य करत आहे.

**आपला/आपली विश्वासू**

**(कर्मचा-याचे नाव)**

---------

एच-२३९१[१६,०००+४०-१२-०८]-३.